**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA**
PHONE :EPABX-2690571(10 lines), 2693643(9 lines), 2693730 (9 lines)
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर—416 004 महाराष्ट्र**
फॅक्स : 0091—0231—691533 व 0091 — 0231—2692333
नॅक विभागाचा दुरघ्वनी 0231—2609087 E-mail : iqac@unishivaji.ac.in
Website : www.unishivaji.ac.in

Estd. 1962
" A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

---

एसयु/अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष/१६६ — दिनांक : १२/०१/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य /संचालक,
सोबत जोडलेल्या यादीनुसार,
सर्व संबधित संलग्नित महाविद्यालय,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीमुळे होणा—या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठस्तरावरून स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्याबाबत...

महोदय / महोदया,

आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त विषयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून आलेला शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण — २०२४/प्र.क्र.०१/विशि ३ दिनांक ०५ जानेवारी, २०२४ सोबत जोडला असून त्यामध्ये नमूद केलेनुसार राज्यातील महाविद्यालयांमधील स्थुल नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी व राज्यात राबविण्यात येणा—या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरणामुळे होणा—या शैक्षणिक बदलांबाबत व त्यांच्या सकारात्मक परिणामांबाबतची माहिती होण्यासाठी 'स्कूल कनेक्ट ( NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावर दि. १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२४ या कालावधीमध्ये राबविण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने सदरचे अभियान राबविण्यासाठी आपल्या महाविद्यालयाची संयोजक महाविद्यालय म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यामुळे आपण उपरोक्त नमूद शासन निर्णयामध्ये दिलेल्या सूचनेनुसार सदर अभियानाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करून याबाबत घेतलेल्या अभियाना संदर्भातील आपला अहवाल अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ यांना हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये (iqac@unishivaji.ac.in) दि. ०५/०२/२०२४ पूर्वी पाठवून देण्यात यावा.

या अभियानाबाबतची माहिती देण्यासाठी प्रशिक्षण शिबीर दि. १६/०१/२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. तरी आपल्या महाविद्यालयांमधील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक यांना सदर प्रशिक्षण शिबीराकरीता पाठवून देण्यात यावे. सदर प्रशिक्षणासाठी उपस्थित समन्वयक यांना प्रवास व दैनंदिनभत्ता आपल्या महाविद्यालय स्तरावर देण्यात यावा.

दि. १६/०१/२०२४ रोजीचे शिबीर झाल्यानंतर सदर शिबीरास उपस्थित सर्व साधन व्यक्तींची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सदर यादी विचारात घेवून आपल्या महाविद्यालयाच्या नजीक असणा—या साधन व्यक्तीस आपण आपल्या महाविद्यालयामध्ये आयोजित करणा—या कार्यक्रमाकरीता आमंत्रित करावे. सोबत जोडलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेनुसार संपर्क अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

सोबत : वरीलप्रमाणे

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

Office of the Director – Internal Quality Assurance Cell (IQAC)

Website: www.unishivaji.ac.in, E-mail: iqac@unishivaji.ac.in, Contact No.: 0231-2609087

With CGPA 3.52


No. SU/IQAC/School Connect (NEP Connect) Abhiyan/168 Date: 17 JAN 2023

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संयोजक महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषी विद्यापीठस्तरावरून स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) हे संपर्क अभियान राबविण्याबाबत...

**संदर्भ :** १. शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण - २०२४/प्र.क्र.०१/विशि-३, दिनांक ०५ जानेवारी, २०२४.
२. या कार्यालयाचे संदर्भ क्र. एसयु/अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष/१६६ दिनांक १२ जानेवारी, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यातील महाविद्यालयांमध्ये स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्याचे अनुषंगाने व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० विषयी व्यापक जनजागृती निर्माण करण्याचे हेतूने स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) या संपर्क अभियान अंतर्गत इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयीन स्तरावरून स्कुल कनेक्ट या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १५ जानेवारी ते ३१ जानेवारी, २०२४ या कालावधीत करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी संपन्न झालेल्या प्रशिक्षण शिबीरामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाचे स्तरावर दिनांक १५ ते ३१ जानेवारी, २०२४ या कालावधीत या कार्यक्रमाचे आयोजन आपल्या नजीकच्या परिसरात असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता करावे. तसेच पदवीच्या अंतीम वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना या अभियानामध्ये सहभागी करून घ्यावे. दिनांक ०५ जानेवारी, २०२४ शासन निर्णयात नमूद प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजनास्तव आपणास आवश्यक खालील नमूद बाबी या पत्रासह आपल्या पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात येत आहे.

१) शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण - २०२४/प्र.क्र.०१/विशि-३, दिनांक ०५ जानेवारी, २०२४.
२) विद्यापीठाद्वारे प्रशिक्षित साधन व्यक्तींची यादी.
३) शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांची उपलब्ध यादी.
४) स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) संपर्क अभियान राबविण्याकरीता नियोजित वेळापत्रक.
५) फ्लेक्स नमुना
६) प्रमाणपत्राचा नमुना
७) इयत्ता १२ वी व पदवीच्या अंतीम वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणीकरीता गुगल फॉर्मचा नमुना.
८) स्कुल कनेक्ट (NEP कनेक्ट) या संपर्क अभियानाच्या अनुषंगाने आवश्यक माहिती / अहवाल / शासन निर्णय विदयापीठाच्या संकेतस्थळावर University Home Page ➡ IQAC ➡ School Connect (NEP Connect) उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

कृपया सदर कार्यक्रमाचे नियोजन करतेवेळी दिनांक ०५ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे तथा कार्यक्रमाची सुरूवात विद्यापीठ गीताने व सांगता राष्ट्रगीताने करावी. तसेच कार्यक्रमाचा अहवाल त्याचदिवशी कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर मा. संचालक, आय. क्यू. ए. सी., शिवाजी विद्यापीठ यांना इमेलद्वारे (iqac@unishivaji.ac.in) पाठविण्यात यावा. सदर संपर्क अभियानासाठी नजीकच्या महाविद्यालयातील साधन व्यक्तींना आमंत्रित करण्यात यावे. तसेच कार्यक्रमाचे उद्घाटन सत्रात विद्यापीठाच्या विविध प्राधीकरणाचे सदस्य व अधिकारी यांना आमंत्रित करण्यात यावे.

स्नेहांकीत,

Deshmukh

(प्रा. डॉ. एम. एस. देशमुख)
संचालक, आय. क्यू. ए. सी.